आदिम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आदिम विशेष पॅकेज तयार करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्र.आविवि -२०२६/प्र.क्र.५८ (१६४०३१७) /का-०९

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक - ०४ नोव्हेंबर, २०२६.

वाचा: -

१. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.न्युबयो-२०११/प्र.क्र.८७/का-०७, दि.२१/०६/२०१३
२. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. ठबायो-२०२१/प्र.क्र.१५/ का-०९,दि.०३/०२/२०२३
३. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.कौविका-२०२२/प्र.क्र.४६/ का-०९,दि.१६/०२/२०२४
४. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.वहका-२०२३/प्र.क्र.२१८/का-१४, दि.१३/०३/२०२४
५. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.न्युबयो-२०२५/प्र.क्र.३४/का-०९, दि.१७/०४/२०२५
६. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन-२०२६/प्र.क्र.२०/जमीन-१, दि.२५/०३/२०२६.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने राज्यातील कातकरी, कोलाम व माडिया या ३ जमातींना आदिम जमाती म्हणून घोषित केले आहे. आदिम जमाती या आदिवासी समाजातील अत्यंत मागास जमाती असुन त्यांचा रहिवास दुर्गम भागात विखुरलेल्या स्वरुपात आहे. त्यामुळे त्यांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यास अडथळे येतात. या समाजास प्राथमिक विकासाच्या मूलभूत सोई सुविधा उपलब्ध करुन देणे अत्यावश्यक असुन त्यामुळे त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे शक्य होईल.

केंद्र शासनाद्वारा देशातील आदिम जमातींच्या सर्वांगीण विकासाकरिता मा. प्रधानमंत्री महोदय यांच्या हस्ते दि. १५ नोव्हेंबर, २०२३ रोजी प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM JANMAN) या योजनेचे कार्यान्वयन करण्यात आले आहे. योजनेमध्ये जीवनमान उंचावण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या ११ प्राधान्य क्षेत्रांचा, संबंधित ९ मंत्रालयीन विभागाद्वारे समावेश करून, आदिम समाजाच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय ठेवण्यात आले आहे.

शासकीय योजनांमधील शासकीय अनुदानाव्यतिरिक्त असलेला लाभार्थी हिस्सा भरण्याची आर्थिक कुवतही आदिम समाजाची नसल्याने त्यांना बऱ्याच उत्पन्न वाढीच्या शासकीय योजनांचा

लाभ घेता येत नाही. त्यामुळे त्यांना शाश्वत उत्पन्नाची साधने/रोजगार मिळत नाहीत, परिणामस्वरुप त्यांचेबाबतीत शासकीय योजना केवळ कागदांवरच राहून त्यांचा प्रत्यक्ष लाभ या समाजातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नाही. ही वस्तुस्थिती पाहता मा. मंत्री, आदिवासी विकास यांनी सन २०२५-२६ च्या जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये आदिम समाजासाठी विशेष पॅकेज सुरु करण्याची आवश्यकता असल्याची बाब नमूद केली.

मा.मुख्यमंत्री महोदय यांनी विकसित महाराष्ट्र २०४७ महाराष्ट्र शासनाचा सन २०२६-२७ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर करताना केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये आदिम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष पॅकेजद्वारा निधी राखीव ठेवण्यात येणार आहे, अशी घोषणा केलेली आहे.

वाचा मधील अनु.क्र.१ मधील शासन निर्णयान्वये केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना (न्युक्लिअस बजेट योजना) आदिवासी विकास विभागाद्वारा राबविण्यात येत आहे. सदर योजनेतंर्गत आदिवासी व्यक्ती/कुटुंबास वैयक्तिक लाभ तसेच २ किंवा त्यापेक्षा अधिक लाभार्थी एकत्र आले तर सामुहिक प्रकल्प/कार्यक्रम मंजूर करण्यात येऊन अर्थसहाय्य करण्यात येते. आदिम समाजातील लाभार्थ्यांसाठी स्थानिक परिस्थितीनुरुप त्या समाजाच्या गरजेनुसार/मागणीनुसार, वैयक्तिक/सामुहिक स्तरावर योजनांचा लाभ देण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. यासाठी आदिम समाज बहूल लोकसंख्या असलेल्या पालघर व रायगड जिल्ह्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे अध्यक्षतेखाली वाचा येथील अनु.क्र. ५ मधील शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समित्यांनी/जिल्ह्यांनी शासनास अहवाल सादर केलेला असून अहवालामध्ये या समाजासाठी वैयक्तिक व सामुहिक स्वरुपाच्या वेगवेगळ्या योजना प्रस्तावित केलेल्या आहेत.

उपरोक्त समित्यांकडील अहवाल, न्युक्लिअस बजेट (केंद्रवर्ती अर्थसंकल्प) योजनेच्या मार्गदर्शक सूचना, मा.मंत्री, आदिवासी विकास यांनी सन २०२५-२६ च्या जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमाच्या नियोजनाच्या बैठकीत नमूद केलेली बाब व मा. मुख्यमंत्री महोदय यांनी अर्थसंकल्पिय घोषणेमध्ये केलेल्या घोषणेस अनुसरून आदिम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष पॅकेज तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

१) मा.मुख्यमंत्री महोदय यांनी विकसित महाराष्ट्र २०४७, महाराष्ट्र शासनाचा सन २०२६-२७ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर करताना केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये आदिम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष पॅकेजद्वारा निधी राखीव ठेवण्यात येणार आहे, अशी घोषणा केलेली आहे. त्यास अनुसरून खालीलप्रमाणे आदिम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष पॅकेज राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वैयक्तिक /सामुहिक लाभाच्या योजना ⟹

(अ) आदिम समाजाच्या सर्वांगीण विकासातंर्गत त्यांना उत्पन्नवाढीच्या, मानव संसाधन विकासाच्या योजनांचा लाभ मिळण्याच्या उद्देशाने आदिवासी विकास विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या न्युक्लिअस बजेट योजनेंतर्गत शासनास योग्य वाटेल त्या-त्या आर्थिक वर्षात विशेष पॅकेज द्वारा निधी राखून ठेवण्यात येईल. त्यास अनुसरुन सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात न्युक्लिअस बजेट योजनेतंर्गत केलेल्या तरतूदीमधून रु.३०.००/- कोटी इतका निधी आदिम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष पॅकेजद्वारा राखीव ठेवण्यात येत आहे.

मूलभूत सोयीसुविधा ⟹

(आ) आदिम समाजाच्या सर्वागीण विकासातंर्गत त्यांना आवश्यक मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आदिम पाडे/वाडे/वस्ती/प्रभाग यामध्ये पुढील परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद केलेली कामे आदिम जमाती विकास कार्यक्रमांतर्गत असलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून घेण्यात येतील. त्यानुसार सन २०२६-२७ साठी आदिम जमाती विकास कार्यक्रमांतर्गत रु.१००.००/- कोटी अर्थसंकल्पीय तरतूदीमधून अशी कामे घेण्यात येतील.

२. वरील परिच्छेद क्र.१ मधील 'अ' मध्ये नमूद केल्याप्रमाणे न्युक्लिअस बजेट योजनेतंर्गत उत्पन्नवाढ, मानव संसाधन विकासासाठी आदिम समाजास द्यावयाच्या वैयक्तिक/सामुहिक लाभाच्या योजनांसाठी विशेष पॅकेज.

(क) केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतंर्गत वैयक्तिक तसेच सामुहिक लाभाच्या योजनांसाठी पात्र आदिम लाभार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येते. सदर योजनेतंर्गत उत्पन्न निर्मितीच्या किंवा उत्पन्न वाढीच्या योजना या गटामध्ये सर्वसाधारण आदिवासी लाभार्थी यांना अर्थसहाय्य ८५ टक्के व आदिम जमातीसाठी १०० टक्के अर्थसहाय्य देण्यात येते. विविध शासकीय योजनांमधील शासकीय अनुदानाव्यतिरिक्त असलेला लाभार्थी हिस्सा भरण्याची आर्थिक कुवतही आदिम समाजाची नसल्याने त्यांना बऱ्याच उत्पन्न वाढीच्या शासकीय योजनांचा लाभ घेता येत नाही त्यामुळे ते अशा योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. परिणामस्वरुप त्यांचा विकास साधण्यास अडथळा निर्माण होतो. केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतंर्गत सदर अनुदानाची एकूण रक्कम वैयक्तिक योजनेसाठी ही रु.५०,०००/- च्या मर्यादेत व २ किंवा ३ किंवा अधिकलाभार्थी एकत्र आल्यास सामुहिक योजनेसाठी रु.७,५०,०००/- एवढ्या मर्यादेत आहे.

केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतंर्गत तसेच शासनाच्या विविध योजनांसाठी पात्र आदिम लाभार्थी यांनी मागणी केल्यास प्रकरणपरत्वे वरीलप्रमाणे वैयक्तिक अथवा सामुदायिक लाभ हे आदिम विशेष पॅकेजसाठी राखीव रु.३०.००/- कोटी तरतूदीतून देण्यात यावेत. त्याव्यतिरिक्त अतिरिक्त मागणी आल्यास निधी उपलब्धतेनुसार केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेच्या उर्वरित अर्थसंकल्पिय तरतूदीतून निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

(ख) शासनाच्या विविध विभागामार्फत समाजाच्या विकासासाठी विविध वैयक्तिक तसेच सामुहिक लाभाच्या योजना राबविण्यात येतात. सदर योजनांचा लाभ आदिवासी समाजासही देण्यात येतो. याव्यतिरिक्त आदिवासी घटक कार्यक्रमाखाली आदिवासी समाजाच्या विकासासाठी खुद्द आदिवासी विकास विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. तसेच आदिवासी

घटक कार्यक्रमाखाली केंद्र /राज्य/जिल्हा योजनांसाठी इतर प्रशासकीय विभागांना आदिवासी विकास विभागाकडून पूरक निधी वितरित करण्यात येतो. वर नमूद केल्याप्रमाणे आदिवासी विकास विभागाबरोबरच इतर विभागांमार्फत वैयक्तिक/सामुहिक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येतात. अन्य विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये लाभार्थी हिस्स्यामुळे बऱ्याच वेळा इतर विभागांच्या योजनांचा लाभ आदिम समाजास घेता येत नाही. त्यामुळे अशा योजनांचा त्यांना लाभ मिळण्यासाठी तसेच इतर विभागाच्या योजनांचा अधिकाधिक निधी या समुदायास प्राप्त करून घेण्याच्या उद्देशाने केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतंर्गत जाहीर आदिम विशेष पॅकेज मधून लाभार्थ्याने मागणी केल्यास अशा योजनांच्या लाभासाठी पात्र लाभार्थी यांना लाभार्थी हिस्सा वैयक्तिक योजनेसाठी रु.५०,०००/-च्या मर्यादेत व २ किंवा ३ किंवा अधिक लाभार्थी एकत्र आल्यास, सामुहिक योजनेसाठी रु. ७,५०,०००/- या मर्यादेत केंद्रवर्ती योजनेतील अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येईल. यासंदर्भात काही उदाहरणे पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

I. कृषी व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाकडून दि.०१/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येणारी बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना -

या योजनेतंर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या शेतकऱ्यांना "नवीन विहीर खोदणे, जुनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, पंप संच, पिव्हीसी/एचडीपीई पाईप, शेततळ्यांचे प्लास्टीक अस्तरीकरण, परस बाग, सूक्ष्म सिंचन संच" या बाबींसाठी अनुदान देण्यात येते.

सदर योजनेच्या दि.०१/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२ मधील VI,VIII,IX,X व XI तसेच परिच्छेद क्र.३ ई मधील तरतूदी पुढीलप्रमाणे आहे.

VI. *शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकासाठी प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्यांचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% किंवा रू २.लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय असेल.*

VIII. ठिबक सिंचन संचासाठी अल्प, अत्यल्प व बहुभुधारकांना रु.९७ हजार किंवा ठिबक सिंचन संचाच्या प्रचलित आर्थिक मापदंडानुसार परिगणित होणाऱ्या अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% यापैकी जे कमी असेल ते अनुदान प्रदेय असेल.

IX. ठिबक सिंचन संचासाठी प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत (१) अल्प / अत्यल्प भूधारकांसाठी ५५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून २५% + बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेतून १०% तसेच (२) बहू भूधारकांसाठी ४५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून ३०% + बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेतून १५% किंवा रू. ९७,०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान (एकूण ९० टक्के अनुदान मर्यादेत) प्रदेय असेल.

X. तुषार सिंचन संचासाठी अल्प, अत्यल्प व बहुभुधारकांना रु.४७ हजार किंवा तुषार सिंचन संचाच्या प्रचलित आर्थिक मापदंडानुसार परिगणित होणाऱ्या अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या रकमेवर ९०% अनुदान यापैकी जे कमी असेल ते अनुदान प्रदेय असेल.

***XI**. तुषार सिंचन संचासाठी प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत **(१)** अल्प / अत्यल्प भूधारकांसाठी ५५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून २५% + बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेतून १०% तसेच **(२)** बहू भूधारकांसाठी ४५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून ३०% + बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेतून १५% किंवा रू. ४७,०००/- यापैकी जे कमी असेल ते अनुदान (एकूण ९० टक्के अनुदान मर्यादेत) प्रदेय असेल.*

अशा तरतूदी आहेत.

***३ ई**. विंधन विहिरी या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यासच (फक्त वनक्षेत्रातील आदिवासी शेतकऱ्यांनाच) विंधन विहिर, सोलार पंपसह रु.१,००,०००/- एवढ्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल.*

अशा तरतूदी आहेत.

- **वरील योजनेतंर्गत वर नमूद एक किंवा अधिक तरतूदीमधील नमूद लाभार्थी हिस्सा पात्र लाभार्थ्यास मागणी केल्याप्रमाणे रु.५०,०००/- च्या मर्यादेत केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतंर्गत आदिम पॅकेज मधून शासनामार्फत देण्यात येईल.**

II. **कृषी व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाकडून दि.०९/०३/२०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येणारी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता विकास योजना.**

१) ५ दुधाळ गाय/म्हैस पालन प्रकल्पांद्वारे उद्योजकता विकास योजना
२) शेळी मेंढी पालन प्रक्रियेद्वारा उद्योजकता विकास योजना
३) कुक्कुट पक्षांचे वाटप
४) वैरण विकास योजना
५) उद्योजकता विकास योजना
६) इत्यादी

III. **कृषी व पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाकडून दि.०९/०३/२०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येणारी मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना.**

१) राज्यस्तरीय योजना -

(अ) निमखारे पाणी कोळंबी संवर्धनासाठी सुपर-इंटेन्सिव्ह पद्धतीने कोळंबी संवर्धन करणे

२) जिल्हास्तरीय योजना -

(क) माती व पाणी परिक्षण संच खरेदीवर अनुदान (५ हेक्टर जलक्षेत्र पर्यंत)

(ख) Paddle Wheel Aerator च्या खरेदीवर अनुदान (प्रति हेक्टरी ४ संच)

(ग) मासे सुकविण्यासाठी सौर संयत्र खरेदीवर अनुदान (किमान १ टन क्षमता)

(घ) समुद्री शैवाळ संवर्धन

(ङ) नविन मत्स्यसंवर्धन तलाव बांधकाम व निविष्ठा अनुदान (२ हेक्टरपर्यंत) मर्यादित

(च) मत्स्यसंवर्धन अस्तित्वातील तलावात पॉलिथीन अस्तरीकरण (२ हेक्टरपर्यंत मर्यादित)

(छ) मत्स्यबीज संगोपन तलाव (२ हेक्टरपर्यंत मर्यादित)

(ज) निमखारे पाणी मत्स्यबीज संगोपन तलाव निर्मिती (२ हेक्टरपर्यंत मर्यादित)

(झ) निमखारे पाणी कोळंबी बीज संगोपन तलाव निर्मिती (०.१५ हेक्टरपर्यंत मर्यादित)

(ञ) बिगर यांत्रिक नौकांचे यांत्रिकीकरण

(ट) सोलर शितपेटी (सोलर रेफ्रिजेरेटर) ई-बाईकसह खरेदीसाठी अनुदान

(ठ) किरकोळ मासळी विक्रेत्यांना खरेदीवर अनुदान

(ड) इष्टतम मत्स्य बोटुकली संचयन

(ढ) फिरते मासे विक्री केंद्र (ई-रिक्षा विथ डिप फ्रिजर)

(ण) सौर उर्जा यंत्रणा उभारणी

(त) नविन बर्फ कारखाना उभारणे/बर्फ कारखान्याचे आधुनिकीकरण (१० टन /२० टन/५० टन)

(थ) तयार मासेमारी जाळी व बिगर यांत्रिकी नौकांवर अनुदान

IV. **कृषी व पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाकडून दि.२०/०१/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार राबविण्यात येणारी एकात्मिक कुक्कुट विकास योजना -**

या योजनेतंर्गत तलंग गट वाटपासाठी एकूण किंमत रु.१०,८४०/- एवढी असून यापैकी रु.५, ४२०/-(५०%) शासकीय अनुदान असून रु.५, ४२०/- (५० %) एवढा लाभार्थी हिस्सा आहे. १०० दिवसीय कुक्कुट पक्षांच्या पिल्लांचे गट वाटपासाठी एकूण किंमत रु.२९,५००/- एवढी असून यापैकी रु.१४,७५०/-(५०%) शासकीय अनुदान असून रु.१४,७५० /- (५० %) एवढा लाभार्थी हिस्सा आहे.

V. **कृषी व पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाकडून दि.१३/०४/२०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता विकास योजनेतंर्गत समाविष्ट केलेली वराह पालन योजना..**

(ग) वरील **ख** मधील **(I) ते (V)** मधील योजना या केवळ उदाहरणादाखल देण्यात आलेल्या असून या विभागाच्या अन्य योजना तसेच इतर विभागांच्या योजनांसाठी नमूद केलेला लाभार्थी हिस्सा, हा सदर योजनांच्या तरतूदीनुसार पात्र लाभार्थ्याने मागणी केल्यास वैयक्तिक लाभासाठी रु.५०,०००/- च्या मर्यादेत व सामुहिक लाभासाठी रु.७,५०,०००/- च्या मर्यादेत केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत सदर योजनेच्या अटी व शर्तीनुसार आदिम पॅकेज मधून शासनामार्फत देण्यात येईल.

तसेच येथे स्पष्ट करण्यात येते की, वैयक्तिक वा सामुहिक लाभाच्या वरील व या विभागाच्या अन्य तसेच इतर विभागाच्या योजनांच्या प्रचलित निकष/तरतूदी यामध्ये काही बदल/सुधारणा झाल्यास त्या विचारात घेऊन संबधित योजनेतील अटी व शर्तीनुसार पात्र लाभार्थ्याने मागणी केल्यास वैयक्तिक लाभासाठी रु.५०,०००/- च्या मर्यादेत व सामुहिक लाभासाठी रु.७,५०,०००/- च्या मर्यादेत अनुदान केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतंर्गत सदर योजनेच्या अटी व शर्तीनुसार आदिम पॅकेज मधून अनुज्ञेय राहील.

(घ) आदिम जमातीपैकी कोलाम व माडिया यांच्याकडे जमीन धारणा असली तरीही जमिन धारणेचे स्वरुप हे अल्पभूधारक आहे. त्यामुळे त्यांना कृषी पुरक व्यवसायांचा अधिकतर लाभ देण्यावर भर देण्यात यावा.

(ङ) आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक यांचेद्वारा उत्पन्न वाढीसाठी विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांचा लाभ आदिम समाजास देण्यासाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी प्रयत्न करावेत. आवश्यकता भासल्यास लाभार्थी हिस्सा आदिम पॅकेजमधून केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतील अटी व शर्तीच्या अधिन राहून वैयक्तिक लाभासाठी रु.५०,०००/- च्या व सामुहिक लाभासाठी रु.७,५०,०००/- च्या मर्यादेत देण्यात यावा. (उदा. मालवाहू मिनी ट्रक, ई-रिक्षा वगैरे)

(च) आदिवासी विकास विभागाच्या केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतंर्गत द्यावयाच्या लाभासाठी आदिम पॅकेज

ज्या योजना आदिवासी विकास किंवा कल्याणाच्या दृष्टीने स्थलकालानुरुप आवश्यक आहेत आणि त्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात किंवा केंद्रीय निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये नाही अशा अभिनव स्वरुपाच्या स्थानिक महत्वाच्या योजना, तांत्रिक औपचारिकतेमुळे दीर्घ कालावधीकरीता अडकुन न पडता स्थानिक पातळीवर तातडीने आणि प्रभावीपणे कार्यान्वित करुन त्यांचा लाभ गरजु आदिवासींना प्रत्यक्ष मिळवून देणे हा **केंद्रवर्ती अर्थसंकल्प** योजनेचा गाभा आहे.

आदिम समाज हा राज्यातील विविध जिल्हयात विखुरलेल्या स्वरुपात असून प्रत्येक ठिकाणची स्थानिक गरज/ आवश्यकता/ मागणी/ वाव विचारात घेऊन या समाजास केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतंर्गत द्यावयाच्या लाभासाठी आदिम पॅकेज मधून वरील संकल्पना विचारात घेऊन वैयक्तिक व सामुदायिक स्वरुपाच्या नाविन्यपूर्ण योजना तसेच स्थानिक गरज/निकड/मागणी विचारात घेऊन उत्पन्न निर्मितीच्या आवश्यक योजना संबंधित प्रकल्प अधिकारी अथवा अपर आयुक्त यांनी त्यांच्या अधिकारक्षेत्रात केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतंर्गत सदर योजनेच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर कराव्यात. ***केवळ उदाहरणादाखल अशा काही योजना खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेत,***

वैयक्तिक लाभाच्या योजना - वैयक्तिक व्यवसाय सुरु करण्यासाठी/उत्पन्न वाढविण्यासाठी वैयक्तिक लाभ योजना-

शिलाई मंशीन यंत्र, सायकल दुरुस्ती साहित्य ,चहा स्टॉल, फुलहार आणि गुच्छ विक्री स्टॉल, फिरते रसवंती केंद्र, शेती औजारे, ब्युटी पार्लर सुरु करण्यासाठी साहित्य, भाजीपाला स्टॉल, खेळणी साहित्य, दुचाकी पंचर दुरुस्ती साहित्य, पत्रावळी बनविण्यासाठी यंत्र, कुटीर उद्योग साहित्य (उदा.शेवया, पापड, लोणचे, कुरुड्या वगैरे) इत्यादी

सामुहिक लाभाच्या योजना - व्यवसाय सुरु करण्यासाठी/उत्पन्न वाढविण्यासाठी योजना-

⬇

मसाला कांडप यंत्र, आटाचक्की, मंडप साहित्य, शुद्ध पेयजल विक्री केंद्र उभारणी, माल वाहतूक गाडी, विटभट्टी, बेकरी उत्पादने तयार करणे, बँड साहित्य संच, फिरते नाष्टा केंद्र, दूग्ध संकलन केंद्र व दूग्धजन्य पदार्थांची उत्पादन व विक्री, झेरॉक्स व टायपिंग केंद्र, सामुहिक कुटीर उद्योग साहित्य (उदा.शेवया, पापड, लोणचे, कुरुड्या वगैरे), दाल मिल, तेलघाणा, व्यावसायिक फोटोग्राफी/व्हिडीओ शुटिंग साठी साहित्य, वेल्डींग, फॅब्रीकेशन इत्यादी.

३. वरील परिच्छेद क्र.१ मधील 'आ' मध्ये नमूद केल्याप्रमाणे आदिम समाजाच्या सर्वांगीण विकासांसाठी आवश्यक मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आदिम समाजासाठी विशेष पॅकेज.

⬇

सामुहिक सुविधा ➡ शासनाच्या विविध विभागांकडून समाजाच्या विकासासाठी विविध योजनेद्वारा मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्यात येतात. आदिवासी विकास विभागाद्वारे आवश्यकतेनुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रात मूलभूत सोयी-सुविधांसाठी पुरक निधी पुरविण्यात येतो.

केंद्र शासनाने दिलेल्या सूचनांनुसार धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान योजनेच्या अंमलबजावणीसाठी राबविलेल्या आदि कर्मयोगी अभियानांतर्गत आदिवासी गावांचे ग्राम विकास आराखडे (Village Development Plan) बनवून आदि प्रसारण पोर्टलवर अपलोड करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये आदिम गावांचाही समावेश असून आदिम वाडे/पाडे/वस्ती यामध्ये मूलभूत सोयी सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने सदर आदिम गावांच्या ग्राम विकास आराखड्यातील कामे खाली नमूद केलेल्या समितीच्या मान्यतेने मंजूरीसाठी शासनास सादर करावीत.

<u>समितीची रुपरेषा</u>

अ.क्र.	पदनाम	समितीमधील पद
१	जिल्हाधिकारी	अध्यक्ष
२	मुख्य कार्यकारी अधिकारी	सदस्य
३	अंमलबजावणी यंत्रणेचे संबधित अधिकारी	सदस्य
४	संबधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प	सदस्य-सचिव

वरील समितीने ग्राम विकास आराखड्यातील खाली नमूद प्राधान्य क्षेत्राची कामे प्रथम मान्यतेसाठी शासनास सादर करावीत.

अ.क्र.	सामुहिक विकासाच्या सुविधा
१	पिण्याच्या शुध्द पाण्याची सोय करणे, फिल्टर प्लॅन्ट उभारणे, पाणी पुरवठा योजना करणे, बोअर वेल करणे, हातपंप बसविणे, सबमर्सिबल पंप बसविणे, ड्युअल पंप बसविणे, सार्वजनिक हौद बांधणे, नळ जोडणी करणे.

२	जुन्या विहिरींची दुरुस्ती, विहिरींचे खोलीकरण, गाळ काढणे, बोअर वेलची दुरुस्ती, विंधन विहिरी पाईप वाढविणे,
३	आदिवासी वस्ती / वाडे / पाडे/ समुह (Cluster) यांना जोडणारे रस्ते, शासकीय आश्रमशाळा/एकलव्य निवासी शाळांना/ मुख्य रस्त्यास जोडणारे रस्ते
४	मार्ग/पथ दिप बसविणे, अपारंपारिक उर्जाद्वारे पथदिवे बसविणे.

वर नमूद प्राधान्य क्षेत्राची कामे पूर्ण झालेली असल्यास व तसे प्रमाणित केलेले असल्यासच अन्य सामुहिक विकासाची कामे समितीने विचारात घेऊन शासनास मान्यतेसाठी सादर करावीत. तथापि शासनाकडे इतर गावांमधील वर नमूद केलेल्या प्राधान्य क्षेत्रातील कामांसाठी निधी मागणीचे प्रस्ताव नसल्यास व निधी उपलब्ध असल्यासच अन्य सामुहिक विकासाच्या कामांना मंजूरी देण्याची कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येईल.

निधी स्त्रोत ➡ आदिम जमाती विकास कार्यक्रम या योजनेतंर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी रु.१००.००/- कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. वर नमूद सामुहिक विकासाच्या सुविधा आदिम जमाती विकास कार्यक्रमातून घेण्यात याव्यात.

४. याव्यतिरिक्त केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेत मानव साधन संपत्ती विकासाच्या व आदिवासी कल्याणात्मक योजनांतर्गत खालील उपक्रम/कार्यक्रम आदिम विशेष पॅकेज मधून घेण्यात यावेत.

I. **<u>विविध शासकीय दस्तऐवज उपलब्धता</u>** - शासकीय योजनांसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे विविध शासकीय यंत्रणांमार्फत देण्यात येतात. शासकीय कागदपत्रे उपलब्ध करून घेताना अनुसरावयाची कार्यपद्धती/कागदपत्रे देणारी यंत्रणा याबाबत आदिम जमातीच्या लोकांना माहिती नसते किंवा त्यांना सदरची कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य केले जात नाही. त्यामुळे त्यांना सर्व शासकीय योजनांसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे उदा. आधारकार्ड, मतदार ओळखपत्र, शिधापत्रिका, नरेगा जॉबकार्ड , आयुष्यमान कार्ड, वाहन चालक परवाना, बँक खाते व अन्य आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी संबधित विभागांसमवेत/यंत्रणेसमवेत समन्वय साधून त्यांच्यामार्फत सदरची कागदपत्रे संबंधितांना उपलब्ध करून द्यावीत. यासाठी आवश्यक ती जनजागृती करावी, आवश्यक त्या ठिकाणी शिबिरांचे आयोजन करावे.यासाठी विविध कार्यक्रम/उपक्रम हाती घेण्यात यावीत. या संदर्भात विविध शासकीय यंत्रणांच्या संबंधित अधिकारी यांनी संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना सहाय्य करणे बंधनकारक राहील

II. जात प्रमाणपत्र उपलब्धतेसाठी उपविभागीय अधिकारी यांचेकडे विशेष मोहीम राबविणे, यासाठी शिबिरांचे आयोजन करणे. या संदर्भात विविध शासकीय यंत्रणांच्या संबंधित अधिकारी यांनी संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना सहाय्य करणे बंधनकारक राहील

III. व्यसनाधिनता याबद्दल समुपदेशन,

IV. अंधश्रद्धा निर्मूलन, समाज प्रबोधन, बाल विवाह, नरबळी, बहुपत्नीत्व याबद्दल जागरूकता,

V. **<u>शैक्षणिक विकास कार्यक्रम</u>** - वस्तीशाळा, रात्रशाळा , प्रौढशिक्षण, शाळेमधील विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढावी व ती नियमित राहावी तसेच शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विविध उपक्रम राबविणे.

आदिम जमातीचे नागरिक शेतीचा हंगाम संपल्यावर कामासाठी इतरत्र स्थलांतरित होत असतात. अशा स्थलांतरित नागरिकांच्या मुंलांसाठी उन्हाळाच्या सुट्टीत नजीकच्या शासकीय आश्रमशाळेमध्ये निवासी शिबिरे आयोजित करावीत.

VI. शासनाच्या विविध योजना, केंद्रीय योजना, जिल्हा वार्षिक योजना यांची माहिती होण्यासाठी मेळाव्यांचे आयोजन, शक्यतो अशी माहिती, आदिम जमातीच्या बोलीभाषेतून देणे. यासाठी मार्गदर्शनपर नाटक, गाणे, समुह गाण,पारंपारिक लोकगीत वगैरे सादर करणे, तसेच मनोरंजनातून लोक शिक्षण , विकास दृष्टिकोन विकसित करणे.

VII. सांस्कृतिक मूल्य, चालीरिती इत्यादी सांस्कृतीक बाबी यांचे संवर्धन करण्यासाठी उपक्रम राबविणे.

VIII. विविध उपक्रम/कार्यक्रम सभा आयोजित करून पेसा व वनहक्क कायदा याबाबत माहिती देणे, जनजागृती करणे.

IX. कला, संस्कृती विषयक बाबी.

X. **<u>आरोग्य शिक्षण, आरोग्य तपासणी शिबीर</u>** - अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात गरोदर महिला, बालके यांच्या आरोग्यासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबविले जातात तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राद्वारे आरोग्यासाठी प्राथमिक सुविधा पुरविण्यात येतात, असे असतानाही बहुतांश आदिम समुदायामध्ये आरोग्यविषयी पुरेशी जनजागृती झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे त्यांना आरोग्य शिक्षणाचे महत्व पटवून देण्यासाठी आरोग्य विभागामार्फत / आरोग्य क्षेत्रात कार्य करणाऱ्या नामांकित अशासकीय संस्थामार्फत अथवा अन्य नामांकित संस्थामार्फत तपासणी शिबिरांचे आयोजन करुन अधिकाधिक आदिम समुदायाला आरोग्यविषयक सेवांचे लाभ देण्यात यावेत. तसेच जन-जागृतीद्वारा आरोग्यविषय़क शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांना प्रवृत्त करावे. अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, आरोग्य परिचारिका यांच्या आदिम वस्तीवरील भेटी वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत यासाठी विविध उपक्रम/कार्यक्रम राबविण्यात यावेत यासाठी येणारा खर्च आदिम विशेष पॅकेजमधून करण्यात यावा.

XI. वर नमूद केलेल्या योजना/उपक्रम/कार्यक्रम हे केवळ उदाहरणादाखल दिलेले असून आदिम समाजाची मागणी, स्थानिक गरज/निकड यांचा विचार करून त्याप्रमाणे योजना/उपक्रम/कार्यक्रम राबविण्यात यावेत.

- **निधी उपलब्धता - वरील उपक्रम/कार्यक्रम/शिबिर राबविण्यासाठी तसेच वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या उपाययोजनांसाठी आदिम पॅकेजमधून केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेच्या अटी व शर्तीनुसार निधी उपलब्ध करून देण्यात यावा.**

५. वाचा येथील अनु.क्र. ३ मधील दि.१६/०२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये आदिवासी विकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या रोजगारभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमासाठी स्वतंत्र्यरित्या शिबीरे आयोजित करावी. शिबीरांचे आयोजन व त्यासाठी निधी आदिम विशेष पॅकेज मधून उपलब्ध करून द्यावा. आदिम युवक/युवती यांच्यासाठी रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम हा आदिवासी युवकांसाठी रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत शबरी आदिवासी व वित्त विकास महामंडळाकडून राबविण्यात यावा.

वनहक्कधारकांना लाभ

६. आदिम जमातीमधील वनहक्कधारकांना त्यांना वनपट्टे मिळाल्यावर त्यावर अनुज्ञेय असलेले शासकीय योजनांच्या लाभाबाबत ते अनभिज्ञ असतात. त्यामुळे अनूसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ सुधारणा नियम, २०१२ अंतर्गत आदिम समाजाचे वनहक्क धारकांना आदिवासी विकास विभागाच्या दि.१३/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्व शासकीय योजनांचा लाभ देण्यात यावा. आवश्यकतेप्रमाणे या शासन निर्णयाची जनजागृती/प्रचार व प्रसिद्धी करण्यासाठी आवश्यक ते कार्यक्रम/उपक्रम हाती घेण्यात यावी व यासाठी येणारा खर्च हा केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतील मानव साधन संपत्ती विकासाच्या व आदिवासी कल्याणात्मक योजनांमधील तरतूदीनुसार व सदर योजनेच्या अटी व शर्ती विचारात घेऊन आदिम पॅकेजमधून करण्यात यावा.

वनौपज

७. वनउत्पादनवार आधारित व्यवसाय/बाजारपेठ उपलब्धता यासाठी केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतील मानव साधन संपत्ती विकासाच्या व आदिवासी कल्याणात्मक योजनांमधील तरतूदीनुसार व सदर योजनेच्या अटी व शर्ती विचारात घेऊन आवश्यकतेनुसार आदिम विशेष पॅकेजमधून प्रशिक्षण देण्यात यावे.

८. आदिम समाजापैकी विशेषत: कातकरी समाज हा अधिकतर भूमिहीन समाज आहे. भूमिहिन दारिद्र्यरेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभीमान योजनेतंर्गत आदिम जमातीला प्राधान्याने लाभ देण्याची तरतूद आहे. आदिम जमातीमधील भूमिहीन दारिद्र्यरेषेखालील घटकांना भूमिहीन दारिद्र्यरेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभीमान योजनेतंर्गत लाभ देण्यासाठी जिल्हाधिकारी व संबंधित उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समित्यांनी सर्वतोपरी प्रयत्न करावेत. आवश्यकता भासल्यास जमीन खरेदी विक्री प्रकियेत मुद्रांक शुल्क ,नगररचना, भूमि अभिलेख कार्यालय यांचेद्वारा आकारण्यात येणारे शुल्क केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतील अटी व शर्तीच्या अधिन राहून वैयक्तिक लाभासाठी रु.५०,०००/- च्या मर्यादेत उपलब्ध करून द्यावेत.

शासन नियमानुसार निवासी अतिक्रमणे नियमित करण्यासंबधी तरतूदींची अंमलबजावणी

९. वाचा येथील अनु.क्र.६ मधील दि.२५/०३/२०२६ रोजीच्या महसूल विभागाच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतूदींनुसार शासकीय जमीनीवरील दि.०१/०१/२०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे नियमित करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयातील तरतूदी व कालमर्यादेबाबत जन-जागृती करण्यात यावी. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार पात्र आदिम जमाती यांना व त्यात विशेषत: कातकरी समाजाच्या निवासी प्रयोजनासाठीच्या जमीनी नियमाकुल करून त्यांना आवास योजनेचे लाभ देण्याबाबत आवश्यक ते सहकार्य संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास

प्रकल्प यांनी करावे. यासाठी काही उपाययोजना करणे आवश्यक असल्यास केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतील मानव साधन संपत्ती विकासाच्या व आदिवासी कल्याणात्मक योजनांमधील तरतूदीनुसार आदिम पॅकेज मधून निधी उपलब्ध करून द्यावा.

१०. **<u>आदिम विशेष पॅकेज अंतर्गत आदिम महिला बचत गटांचे सक्षमीकरण</u> -**

महिला बाल विकास विभागातंर्गत असलेल्या महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत स्वयंसहाय्यता बचत गटांची निर्मिती, महिलांसाठीचे विविध प्रशिक्षण कार्यक्रम, महिला उत्पादनासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देणे इ. महिला सक्षमीकरणाची कार्ये पार पाडली जातात. महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत तसेच अन्य विभागामार्फत देण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ अधिकाधिक आदिम समाजाच्या महिलांना घेता यावा या उद्देशाने आदिम समाजाच्या महिला बचत गटांना स्वहिस्सा भरण्यासाठी त्यांनी तशी मागणी केल्यास रु.७,५०,०००/- च्या मर्यादेत स्वहिस्सा केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतून सदर योजनेच्या अटी व शर्तीस अधिन राहून आदिम विशेष पॅकेजमधून उपलब्ध करून देण्यात यावा. त्याच प्रमाणे शबरी आदिवासी वित्त विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ अधिकाधिक आदिम समाजाच्या महिलांना घेता यावा यासाठी आदिम समाजाच्या महिला बचत गटांना स्वहिस्सा भरण्यासाठी त्यांनी तशी मागणी केल्यास रु.७,५०,०००/- च्या मर्यादेत केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतून सदर योजनेच्या अटी व शर्तीस अधिन राहून आदिम विशेष पॅकेजमधून उपलब्ध करून देण्यात यावा.

११. **आदिम विशेष पॅकेज योजना अंमलबजावणीच्या अनुषंगाने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प स्तरावरील कर्तव्य व जबाबदाऱ्या**

आदिम पॅकेजच्या अंमलबजावणी साठी प्रकल्प अधिकारी यांचे कर्तव्य व जबाबदारी

१. प्रकल्प कार्यालय स्तरावर सर्व शासकीय योजनांची माहिती आदिम समाजास देण्यासाठी अस्तित्वातील माहिती कक्षामार्फत कामकाज पार पाडण्यात यावे.
२. या माहिती कक्षामार्फत आदिवासी विकास विभाग व इतर सर्व प्रशासकीय विभागांद्वारा राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रचार व प्रसिद्धी करणे तसेच योजनांचा लाभ घेण्याबाबत आदिम समाजास मार्गदर्शन करणे, त्यांना योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या समस्यांचे निराकरण करणे व त्यासाठी आवश्यक ते सर्वतोपरी सहकार्य करणे.
३. लाभार्थी अर्ज मागविण्यासाठी संबंधित विभागामार्फत योजनांची जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर या योजनांमध्ये आदिम समाजाचे जास्तीत जास्त अर्ज उपलब्ध होतील याबाबत प्रयत्न करणे.
४. प्रकल्प स्तरीय मंजूर योजनांमध्ये आदिम समाजास लाभ देत असताना त्यामध्ये आदिम समाजाच्या विधवा, परित्यक्त्या, दिव्यांग, एकल महिलांना प्राधान्याने लाभ मिळेल याची खातरजमा करणे.

५. ज्या आदिम लार्भार्थ्यांकडे योजनांचा लाभ घेण्यासाठी अनुषंगिक कागदपत्रे नाहीत त्यांना कागदपत्रे मिळवून देण्यासाठी प्रकल्प कार्यालयामार्फत शिबिरे आयोजित करणे आणि जास्तीत जास्त आदिम समाजाच्या लाभार्थ्यांना यामधून योजनांची माहिती मिळेल तसेच आवश्यक कागदपत्रे महाराजस्व अभियानांतर्गत लवकरात लवकर मिळतील हे सुनिश्चित करणे.

१२. काही शासकीय योजनांमध्ये लाभार्थ्यांची निवड ही मुख्यत: जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात येते. तर काही योजनांमध्ये लाभार्थ्यांची निवड ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद किंवा इतर संबंधित शासकीय यंत्रणांच्या सक्षम अधिकारी यांचे मार्फत करण्यात येते.

शासकीय योजनांच्या लाभार्थी निवडीच्या बैठकांमध्ये/प्रकियांमध्ये आदिम विशेष पॅकेजमधून आदिम समाजाच्या लाभार्थ्यांना त्यांच्या मागणीप्रमाणे देण्यात येणारा लाभार्थी हिस्सा याबाबतची माहिती प्रकरणपरत्वे जिल्हाधिकारी अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदर बैठकांमध्ये/प्रकियांमध्ये देऊन विविध शासकीय योजनांचा अधिकाधिक लाभ या योजनेच्या माध्यमातून देण्याबाबत खातरजमा करणे गरजेचे आहे.

ज्या शासकीय योजनांसाठी लाभार्थ्यांची निवड जिल्हाधिकारी अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेव्यतिरिक्त इतर संबंधित शासकीय कार्यालयांच्या सक्षम अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येते अशा योजनांमध्ये लाभार्थी निवड करताना या योजनांचा अधिकाधिक लाभ आदिम विशेष पॅकेजच्या माध्यमातून देण्याबाबत संबंधित अधिकारी यांनी खातरजमा करणे गरजेचे आहे.

संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी जिल्हाधिकारी ,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अथवा इतर शासकीय यंत्रणांच्या सक्षम अधिकाऱ्यांमार्फत विविध योजनेतंर्गत लाभार्थी निवडीच्या वेळी आदिम लाभार्थ्यांच्या मागणीप्रमाणे लाभार्थी हिस्सा आदिवासी विकास विभागामार्फत उपलब्ध करून देण्याची बाब निदर्शनास आणून अधिकाधिक आदिम लाभार्थ्यांची निवड होईल याची काळजी घ्यावी व तत्संबंधींचा दस्तऐवज/अभिलेख जतन करावा.

१३. न्युक्लिअस बजेट अंतर्गत आदिम पॅकेज साठी स्वतंत्र आराखडा तयार करावा. आवश्यकता वाटल्यास केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतंर्गत असलेल्या ऑनलाइन पोर्टलमध्ये आदिम पॅकेजसाठी स्वतंत्र टॅब देणे व इतर आनुषंगिक बाबींची उपलब्धता/उपाययोजना आयुक्त, आदिवासी विकास यांनी त्यांचे स्तरावर करावी.

इतर सूचना

१४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०२६११०४१४३५३३११२४ असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAVINKUMAR MANIK PANSARE

Digitally signed by PRAVINKUMAR MANIK PANSARE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tribal Development Dept, 2.5.4.20=B4A07DBA225E6341BB7845B83F17F9BDD703019881501785E906A794A5B1E473, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=16D9E9BE1DA7EEA207781423C0B0F06E22786A5AE7DF2EBEF7370066C141CC82B, cn=PRAVINKUMAR MANIK PANSARE
Date: 2026.11.04 14:36:52 +05'30'

(प्रविणकुमार पानसरे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.
२. मा.सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
७. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१२. सर्व विधानसभा / विधान परिषद सदस्य
१३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
१४. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. सर्व विभागीय आयुक्त,महसूल विभाग
१६. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१८. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१९. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
२०. सर्व जिल्हाधिकारी
२१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, आदिवासी सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित,नाशिक
२२. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त विकास महामंडळ मर्यादित, नाशिक

२३. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती

२४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

२५. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

२६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

२७. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक.

२८. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२९.महासंचालक माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई.

३०.निवड नस्ती (का.०९) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.